● *कल हमारा है* कलाकाराची इमेज लक्षात न घेता भूमिका-विसंगतीमुळे चित्रपट आपटला. ● गुरुदत्तच्या *कागज के फूल* या शेवटच्या चित्रपटाला *बाजी*प्रमाणे ए. डी.चे संगीत होते. ● *इन्सान जाग उठा*वर *नया दौर*चा छाप कथेसह संगीतावरही दिसून आला. ● *सावन*चे एक गाणे असद भोपालींनी तर उर्वरित गाणी प्रेम धवन यांनी लिहिली होती.

□ इसाक मुजावर

कल हमारा है(१९५९):

१९५९चा चित्रगुप्त यांनी संगीतबद्ध केलेला आणखी एक चित्रपट म्हणजे के. अमरनाथ यांचा *कल हमारा है*. पण या चित्रपटातील सर्व गाणी काही त्यांनी एकट्याने संगीतबद्ध केली नव्हती. 'इरादा कत्ल का है, ऐसे न देखो रसिया...' व 'यह सच है ए जहाँ वाले हमे जीना नही आया...' ही दोन गाणी संगीतकार गजानन यांनी संगीतबद्ध केली होती. बाकीची सर्व गाणी चित्रगुप्तनी. 'आज अपना हो न हो पर कल हमारा है...' हे या चित्रपटाचे शीर्षक गीत त्यांच्या संगीतात रफी, सुधा मल्होत्रा यांनी कोरसबरोबर गायले होते आणि हे गाणेच या चित्रपटातील सर्वाधिक लोकप्रिय गाणे होते. सुधा मल्होत्राबरोबर एक गाणे यात असताना रफीने या चित्रपटातील 'झुके है बादल बालों के खुलै है गुलशन...' हे गाणे आशाबाईंच्या बरोबर गायले होते. आणि ते भारत भूषण व मधुबाला यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. भारत भूषण या चित्रपटाचा नायक होता. *बैजू बावरा*च्या लोकप्रियतेमुळे तेव्हा त्याची प्रतिमा तानपुरा घेऊन आपल्या चित्रपटात अभिजात गाणी गाणाऱ्या गायक नायकाची झाली होती. पण ही गोष्ट विचारात न घेता या चित्रपटात त्यांच्या हाती पिस्तुल देण्यात आले होते. *आलाप*मध्ये अमिताभच्या हाती तानपुरा ज्याप्रमाणे विसंगत वाटला होता ना त्याचप्रमाणे या चित्रपटात भारत भूषणच्या हाती पिस्तुल विसंगत वाटले होते. आणि हेच या चित्रपटाच्या अपयशाचे सर्वात मोठे कारण ठरले होते.



मधुबाला व भारत भूषण

आशाबाई व सुधा मल्होत्रा यांच्याबरोबर एकेक गाणे आत असताना रफीने या चित्रपटातील 'घर से तो कट चुका है पता हूं नौजवान अलबता...' व 'यह सच है ए जहाँवाले हमे जीना नही आया...' ही दोन गाणी एकट्याने गायली होती. ती भारत भूषणवर चित्रित करण्यात आली होती. 'इशारा कत्ल का है...' हे या चित्रपटातील नृत्यगीत आशाबाईंच्या आवाजात होते. तर 'आ आ मेरी ताल पर नाच...' हे नृत्यगीत गीता दत्तच्या आवाजात. या दोन नृत्यगीतांबरोबरच 'जा ओ रसिया, हटो जा ओ रसिया कसम झूठी खा के..' हे आणखी एक नृत्यगीत या चित्रपटात होते. ते लता व उषा यांनी गायले होते.

या चित्रपटातील 'इशारा कत्ल का है...', 'यह सच है जहाँवालो...', 'आज अपना हो न हो कल हमारा है...' ही ती गाणी शैलेंद्रनी लिहिली होती. बाकीची गाणी मजरूहनी.

कागज के फूल(१९५९):

सुजाताबरोबरच एस. डी. बर्मन यांनी संगीतबद्ध केलेला गुरुदत्त यांचा *कागज के फूल* हा आणखी एक चित्रपट १९५९ साली पडद्यावर आला होता. गुरुदत्तनी दिग्दर्शित केलेला हा शेवटचा चित्रपट. १९५१चा *बाजी* गुरुदत्तनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट. त्यांचा हा पहिला चित्रपट एस. डी. बर्मननी संगीतबद्ध केला होता. *कागज के फूल* हा त्यांचा शेवटचा चित्रपटदेखील एस. डी. बर्मननीच संगीतबद्ध केला.

बाजी या गुरुदत्त यांच्या पहिल्या चित्रपटात जॉनी वॉकर नगण्य अशा एका छोट्याशा भूमिकेत चमकला होता. पण नंतर त्यांच्या चित्रपटातून प्रकाशात आल्यावर तो त्यांच्या चित्रपटातला इतका महत्त्वपूर्ण कलाकार बनला होता की, गुरूदत्त *कागज के फूल*चे नायक असले तरी या चित्रपटातील एकही गाणे त्यांच्या वाट्याला आले नव्हते. जॉनी वॉकरच्या वाट्याला मात्र दोन गाणी आली होती. या दोन गाण्यांपैकी 'ओ पीटर ओ ब्रदर हेरी ओ भल्ला, ओ मिस्टर बेरी, हम तुम जिसको कहता है शादी...' हे गाणे रफीने एकट्याने गायले होते. तर 'उलटे सिधे दाव लगाए हंस हंस फेका पासा...' हे गाणे रफी व आशाबाईंनी.

कागज के फूल पडद्यावर आला तेव्हा *छोटी बहन, कैदी नं. ९११, ओ तेरा क्या कहना* या चित्रपटांमुळे मेहमूद चांगलाच नावारूपास आला होता. तरीही *कागज के फूल*मध्ये मात्र गुरूदत्तनी त्याला एका नगण्य भूमिकेत चमकवले होते. या नगण्य भूमिकेत या चित्रपटात एक गाणे त्यांच्या वाट्याला आले होते. 'सन सन सन वो चली हवा...' रफीने आशा भोसले व सुधा मल्होत्रा यांच्याबरोबर गायलेले हे गाणे पिकनिकचे एक गाणे होते. आणि ते मेहमूद व रत्ना भूषण यांच्यावर चित्रित करण्यात आले हाते.

गुरूदत्त यांच्या चित्रपटात जॉनी वॉकरच्या गाण्याचा नेहमीच वरचष्मा जाणवायचा. *प्यासा*सारखा गंभीर विषयावरील चित्रपटदेखील याला अपवाद नव्हता. 'जाने वो कैसे लोग थे...', 'ये महलो, ये तख्तो...', 'ये कुचे ये निलाम पर दिलकशी...' यासारख्या अर्थपूर्ण व भावपूर्ण गाण्यांच्या बरोबर जॉनी वॉकरचे 'सर जो तेरा चकराये, या दिल डुबा जाए...' हे गाणे या चित्रपटात तितकेच भाव खाऊन गेले होते. *प्यासा*त हे एकच गाणे जॉनी वॉकरच्या वाट्याला आले होते. *कागज के फूल*मध्ये मात्र दोन गाणी त्याच्या वाट्याला आली होती. पण ही गाणी या चित्रपटातील 'देखी जमाने की यारी, बिछडे सभी बारी बारी...' व 'वक्त ने किया...' या भाव व अर्थपूर्ण गाण्यांना झाकोळून टाकण्याइतपत वरचढ ठरली नव्हती. 'बिछडे सभी बारी बारी...' हे गाणे रफीच्या आवाजात होतं तर 'वक्त ने किया...' हे गाणे गीता दत्तच्या आवाजात. यापैकी 'बिछडे सभी बारी बारी...' हे गाणे म्हणजे या चित्रपटाचे थीम साँग होते. आणि ते दोन भागांत होते.

या चित्रपटाची सुरुवात फ्लॅशबॅकने होते. चित्रपट व्यवसायातून बाहेर फेकला गेलेला आणि परिस्थितीमुळे थकलेला एक दिग्दर्शक सुरेश

सिन्हा (गुरूदत्त) स्टुडियोत येतो. एका सेटवर जातो. तेथे तो दिग्दर्शक असतानाच्या काळातील स्टुडिओतील लाईटस्‌च्या प्रकाशाचे झोत त्याच्या डोळ्यासमोर तरळू लागतात. लाईटस्‌च्या प्रकाशाच्या झोतात तो भूतकाळात हरवून जातो. आणि आपल्या वैभवाचा काळ त्याच्या डोळ्यासमोर तरळू लागतो. 'बिछडे सभी बारी बारी...' या गाण्याचा पहिला भाग या पार्श्वभूमीला सुरू होतो.

'देखी जमाने की यारी, बिछडे सभी बारी बारी...' या गाण्याच्या पार्श्वभूमीवर दिग्दर्शक सुरेश सिन्हाच्या चित्रपटाच्या प्रीमिअरचा थाट, त्याची स्वाक्षरी घेण्यासाठी चाहत्यांचा त्याच्या सभोवती पडणारा गराडा, मोटारीतून तो स्टुडिओत येत असताना ठिकठिकाणी त्याला मिळणारा सलाम हे सारे आपल्याला पाह्यला मिळते. या साऱ्या दृश्याच्या पार्श्वभूमीवर 'बिछडे सभी बारी बारी...' हे गाणे ऐकत असताना या गाण्याचा शब्द न शब्द थेट आपल्या काळजाला भिडतो. आणि चित्रपट व्यवसायाच्या या मायावी दुनियेत कोणाही कलावंताला मिळणारे यश व वैभव क्षणभंगुर आहे याला विषाद आपल्याला वाटू लागतो.

सुरेश सिन्हा आयुष्यात पराभूत झाला आहे, हे दाखवून फ्लॅशबॅकने या चित्रपटाची कथा सुरू होते. ती सुरेश सिन्हाच्या यशापासून. आणि ती शेवटाला येते तेव्हा तो बनलेला असतो एक एक्स्ट्रा. ज्या शांतीला (वहिदा रहमान) अभिनेत्री म्हणून त्याने घडवले. त्या शांतीसमोर फाटक्या अवस्थेत एक एक्स्ट्रा म्हणून उभे राहण्याची पाळी त्याच्यावर येते. शांतीला पाहताच आपले सारे संवाद त्याला सुचत नाहीत. हे पाहून त्याला सेटवरून हाकलून देण्यात येते. पण शांती त्याला ओळखते. 'बिछडे सभी बारी बारी...' या गाण्याचा दुसरा भाग या पार्श्वभूमीवर सुरू होतो. 'उड जा, उड जा प्यासे भंवरे...'


कागज के फूल - गुरुदत्त व वहिदा रहमान

शांती सुरेश सिन्हाच्या मागे धावत असते. पण ती त्याच्यापाशी पोहचण्याच्या आतच तिच्या चाहत्यांचा गराडा स्वाक्षरीसाठी तिच्याभोवती पडतो. आणि या गराड्यात ती व सुरेश सिन्हा यांच्यातील अंतर इतके वाढते की मनात असूनही ती सुरेश सिन्हापर्यंत पोहचू शकत नाही. 'बिछडे सभी बारी बारी...' या गाण्याच्या पार्श्वभूमीवर हे दृश्य पहात असताना हृदयात उगीचच एक कालवाकालव निर्माण होते. आणि चित्रपट व्यवसायाच्या मायावी दुनियेतील एक कटू सत्यच हे गाणे सांगून जाते. या कटू सत्यामुळेच हे गाणे थीम साँग म्हणून या चित्रपटात एकदम चपखलपणे बसून जाते, आणि या चित्रपटाचे हायलाईट ठरते. रफीने कोरसबरोबर गायलेल्या या गाण्यात कोरसचा आवाजदेखील या गाण्यामागची वेदना एकदम बोलका करून जातो.

गीता दत्तनेदेखील या चित्रपटात कोरसबरोबर एक गाणे गायले आहे. 'एक दो तीन चार और...' आकडेमोड करणारं हे गाणं या चित्रपटात शांती शिक्षिका बनून लहान मुलांना शिकवत आहे. या दृश्यावर चित्रित करण्यात आलं आहे.

या चित्रपटाची एकजात सारी गाणी कैफी आजमींनी लिहिली होती. आणि ती लिहिताना साहिर यांच्याप्रमाणेच या चित्रपटाच्या कथेचा आशय त्यांनी आपल्या काव्यात अचूक पकडला होता. यामुळेच *प्यासा*प्रमाणेच या चित्रपटाची गाणी कायमची अजरामर बनून गेली आहेत.

आपल्याकडे सिनेमास्कोप चित्रपटांच्या निर्मितीची सुरुवात *कागज के फूल*नेच सर्वात प्रथम केली. कृष्ण-धवल युगात निर्माण झालेला आपल्याकडील हा पहिलाच सिनेमास्कोप चित्रपट.

इन्सान जाग उठा (१९५९):

सुजाता, *कागज के फूल*बरोबरच एस. डी. बर्मननी संगीतबद्ध केलेला १९५९चा आणखी एक चित्रपट म्हणजे *इन्सान जाग उठा*. शक्ती सामंता या चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक होते. देव आनंद, गुरूदत्त, बिमल रॉय, यांच्याप्रमाणेच शक्ती सामंताच्या चित्रपटाशी देखील एस. डी. बर्मन यांच्या संगीताचा सूर चांगलाच जुळला होता. *इन्सान जाग उठा*तील संगीत म्हणजे शक्ती सामंताच्या चित्रपटात एस. डी. बर्मननी छेडलेला पहिला संगीताचा सूर होता.

शक्ती सामंताचा चित्रपट नेहमीच गुन्हेगारी पार्श्वभूमीवरील असायचा. *इन्सान जाग उठा*देखील याला अपवाद नव्हता. तरीही हा चित्रपट नेहमीच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवरील एक चित्रपट नव्हता. बी.आर.चोप्रांच्या *नया दौर* या चित्रपटाप्रमाणे श्रमदानाची महती सांगणारा एक चित्रपट होता. गुन्हेगारी कथा पार्श्वभूमीला ठेवून श्रमदानाच्या विषयाची डुबी शक्ती सामंतांनी या चित्रपटाला दिली होती. आणि त्यातून होणारे एका गुन्हेगाराचे हृदयपरिवर्तन या चित्रपटात त्यांनी दाखवले होते. यामुळे साठच्या दशकात हा चित्रपट नेहमीच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवरील चित्रपटाहून एक वेगळा चित्रपट ठरला होता. आणि तो भाकरा नांगल धरणाच्या पार्श्वभूमीवर चित्रित करण्यात आला होता. एस. डी. बर्मननी या चित्रपटाचे संगीत नियोजन करताना या चित्रपटाचा संगीताचा बाज काहीसा राजस्थानी तर काहीसा हरीयानवी लोकसंगीताचा ठेवला होता.

*नया दौर*मध्ये श्रमदानाची महती सांगणारं एक गाणं होतं. 'साथी हाथ बढाना...' असंच श्रमदानाची महती सांगणारं एक गाणं *इन्सान जाग उठा* या चित्रपटातदेखील होते. 'ओ मेहनत कर इन्सान जाग उठा...' चरित्र अभिनेते नजीर हुसेन यांना अनेक चित्रपटांत तुम्ही पाहिलेले असल्यामुळे त्यांच्या बऱ्याच भूमिका तुम्हाला आठवतील. पण त्यांनी पडद्यावर गायलेले गाणे आठवण्याचा प्रयत्न तुम्ही केलात तर मात्र एकही गाणे तुम्हाला आठवणार नाही. कारण आपल्या चित्रपटात चरित्र भूमिका करणाऱ्या कलावंताच्या वाट्याला फारशी गाणी येतच नाहीत. पण *इन्सान जाग उठा*मधील 'मेहनत कर इन्सान जाग उठा...' हे गाणे नजीर हुसेन यांच्या वाट्याला आले होते. रफी व आशा भोसलेंनी कोरसबरोबर गायलेले हे गाणे नसीर हुसेन, मधुबाला व मिनू मुमताज यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. या गाण्याबरोबरच आशा व रफी यांनी या चित्रपटात आणखी एक गाणे गायले होते. 'चांदसा मुखडा क्यू शरमाया...' सुनील दत्त व मधुबाला यांच्यावर चित्रित करण्यात आलेले हे गाणे या चित्रपटातील सर्वाधिक लोकप्रिय गाणे होते. या चित्रपटातील आणखी एका गाण्यात चांद होता – 'देखो रे देखो लोगो...' रफीने

कोरसबरोबर गायलेले गाणे हे सुनील दत्त व समूहावर चित्रित करण्यात आले होते. रफीबरोबर दोन गाणी गात असताना आशाबाईंनी या चित्रपटात 'जानू जानू रे...' हे गाणे गीता दत्तबरोबर गायले होते. आणि ते मधुबाला व मिनू मुमताज यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. 'हाय हाय भलाई देखो...', 'बात बढती गई...' व 'आँखे चार होते होते हो गया प्यार...' ही या चित्रपटातील तीन गाणी आशाबाईंच्या आवाजात होती. आणि एस. डी. बर्मन यांच्या संगीतातील गोडवा आशाबाईंनी या साऱ्या गाण्यात अचूक पकडला होता.

शैलेंद्रनी या चित्रपटाची एकजात सारी गाणी लिहिली होती.

***सावन*(१९५९):**

इन्सान जाग उठा फारसा चालला नव्हता. तरीही संगीतासाठी हा चित्रपट आजही लक्षात आहे.

*इन्सान जाग उठा*प्रमाणेच फारसा न चाललेला, पण संगीतासाठी आजही लक्षात असलेला १९५९चा आणखी एक सुरीला चित्रपट म्हणजे *सावन*. हंसराज बहल या चित्रपटाचे संगीतकार होते. *सोहनी महिवाल*, *नवरंग* या चित्रपटातील गाण्यांच्या मुळे महेंद्र कपूरच्या आवाजाचा बोलबाला चित्रपट संगीतात तेव्हा नुकताच सुरू झाला होता. आणि या बोलबाल्यामुळेच हंसराज बहलनी *सावन*मधील दोन गाण्यांत त्याचा आवाज घेतला होता. दोन गाण्यांपैकी 'तुमने कहा छू लिया, कहा था जो वो किया...' हे गाणे त्याने सुमन कल्याणपूरबरोबर गायले होते. तर 'मुरली तेरी, पायल मेरी...' हे गाणे लताबाईंच्याबरोबर.

महेंद्र कपूरबरोबरच रफी व मुकेश यांचा आवाजदेखील या चित्रपटात होता. मुकेशच्या वाट्याला या चित्रपटातील एकच गाणे आले होते. 'नैन द्वार से मन मे...' हे गाणे मुकेशने या चित्रपटात लताबाईंच्या बरोबर गायले होते. आणि या चित्रपटातील सर्वाधिक लोकप्रिय गाणे हेच होते. मुकेशचा आवाज या गाण्यात खालच्या पट्टीवर ठेवण्यात आला होता. आणि लताबाईंचा आवाज वरच्या पट्टीवर यामुळे या गाण्यात एक वेगळीच रंगत निर्माण झाली होती. भारत भूषण व अमिता यांच्यावर हे गाणे चित्रित करण्यात आले होते.

महेंद्र कपूर व मुकेश यांच्याबरोबर एकेक गाणे गात असताना लताबाईंनी या चित्रपटातील 'कान्हा छेडो बासुरी...' व 'तुम्हे याद किया मेरे दिलने कब आओंगे साजना मिलने...' ही दोन गाणी एकटीने गायली होती. आणि ती अमितावर चित्रित करण्यात आली होती.

लता, आशा या गायिकांच्या आवाजाच्या वाढत्या वरचष्म्यात पन्नासचे दशक अस्ताला आले. तेव्हा शमशाद बेगमचा आवाज आपल्या चित्रपट संगीतातून हळूहळू पातळ होऊ लागला होता. पण *सावन*मधील आपल्या संगीतात मात्र हंसराज बहलनी हा आवाज पातळ होऊ दिला नव्हता. त्यांच्या संगीतात शमशादने या चित्रपटातील 'हाय कुछ हो गया जी, क्या हो गया जी...', 'भीगा भीगा प्यार...' व 'मेरी घघरी नू ओ...' ही तीन गाणी रफीबरोबर गायली होती. आणि ती भारत भूषण व अमिता यांच्यावर चित्रित करण्यात आली होती. शमशादच्या आवाजातील नटखट ठसका या तीनही गाण्यात होता. शमशादबरोबर तीन गाणी गात असताना रफीने भारत भूषणवर चित्रित करण्यात आलेले या चित्रपटातील 'देखो बिना सावन...' हे गाणे एकट्याने गायले होते.

या चित्रपटातील लताबाईंचे 'तुम्हें याद किया मेरे दिल ने...' हे एकच गाणे असद भोपालींनी लिहिले होते. बाकीची गाणी प्रेम धवननी. ●

□ हर्षदा वेदपाठक

सोनीवर *आत्मा*

कोलोनियल कझिन्स् या ध्वनिफितीच्या जगभरातील तुफान यशानंतर पुन्हा एकवार लेझली लुईस आणि हरीहरन *आत्मा* या ध्वनिफितीद्वारे एकत्र आले आहेत. 'गायडिंग स्टार' हे लेझली ल्युईसने पारंपरिक गीताच्या आधारे लिहिलेल्या गीताला जयदेवसह स्वतः संगीतबद्ध केलं आहे. 'माता पिता...' हे गीतदेखील लेझलीने स्वतः लिहून संगीतबद्ध केलं आहे. देव कोहलीसह लिहिलेल्या गाण्याला पुन्हा एकवार लेझलीने संगीतबद्ध केलं आहे. त्याचे बोल आहेत 'धीम धीम धीरना...', 'दिल में तू...' या गीताचे गीतकार मुनवर मासुम-लेझली आहेत. तर संगीत लेझलीसह हरिहरनने दिले आहे. आय लव्ह यू गर्ल हे गीत ताहीर फैज आणि लेझलीने लिहिले आहे. तर संगीत लेझली लुईस आणि हरिहरन यांनी दिले आहे. स्वामी त्यागराजसोबत लिहून संगीतबद्ध केलेले श्री राम हे गीत आहे. मुनवर मासूम, मिलिंद जोशी आणि लेझली यांनी लिहिलेल्या 'काय झाला' या गीताला लेझली आणि हरिहरन यांनी संगीतबद्ध केलं आहे. इब्राहम अश्क - लेझली लिखित गीताचे बोल आहेत. 'टर्न अराऊंड' याचे संगीतकार आहेत लेझली ल्युईस आणि हरिहरन लेझली ल्युईस यांनी उस्ताद गुलाम मुस्तफा खानसह गीत-संगीत दिलेल्या गीताचे बोल आहेत, 'सुंदर बलमा'.



साभार पोच

मॅग्नासाऊंड:- दूर (पाकिस्तानी गायक बिलाल मकसूद आणि फैसल कपाडिया यांनी आपल्या स्ट्रींग्स या बॅण्डद्वारे गीटारवर पॉप आणि रॉकचे केलेले मिश्रण आहे.), *तेरी पायल* (विपीन अनेजा या एनआरआयने रवी पवार यांच्या संगीत रचनेवर गाणी गायली आहेत.), *प्यार का पहला खत* (फेस टू फेस ही जुनी ध्वनिमुद्रिका नवीन नावाने प्रदर्शित होत आहे.), *प्यार है* (निदा फाजली, सौरभ भट्ट, नसरत बद्र, राजेश जोहरी, डॉ. हरीराम आचार्य, मदन पाल, रैझ उर रहमान साघेर लिखित गीतांना हरीहरन, श्रीनिवास, प्रवीण मणी, सौरभ भट्ट, श्रीराम, राधा, उत्पल विश्वास, जॉली मुखर्जी, अदनानसामी यांनी संगीतबद्ध केलं आहे. तर हरीहरन, श्रीनिवास; सुजाता, बेला, देवकी पंडित, मोहंमद वकील, अदनान सामी यांनी गायलं आहे.), *मुखडा पीया का* (नक्षलायल पुरी लिखित गीतांना कुलदीप सिंग यांनी संगीतबद्ध केलं आहे. तर आवाज आहे राजेश्वरी सचदेवचा.)

टाईम्स म्युझिक:- *नवकार महामंत्र* (रतन मेहता शर्मा यांच्या संगीतबद्धतेत नवकार मंत्राचा १०८ वेळा जप आहे), *शिवोहम* (असीत देसाई, हेमा देसाई, अलाप देसाई यांनी गायलेली शिवाची विविध रूपं स्तुती आहे), *फिदा* (ॲबी या गायकाने गायलेली गाणी जयंत पाठक यांनी संगीतबद्ध केली आहेत), *हनुमान* (मध्ये श्री हनुमान रक्षोत्तरम, श्री हनुमान गायत्री, श्री संकटमोचन हनुमानष्टक आहे)

एचएमव्ही:- *आओ जोश में* (जोशमधील शंकर महादेवन यांनी संगीतबद्ध केलेले गीत जावेद अख्तर यांनी लिहिले आहे. सोबत *कहो ना प्यार है*, *तक्षक*, *रेफ्युजी* या चित्रपटांतील गाण्यांसह *ब्रेथलेस*, *ओ हो जाने*